# सुखानुभव

तन हरखले मन आनंदले
पांडुरंग पायी चित्तच गुंतले ||१||

मस्तक झुकले ऊर जड झाले
डोळां पाणी आले चरणी पडले ||२||

चरणांवरच नजर खिळली
कळले न कधी शुध्द हरपली ||३||

नाम मुखी आले अंतरी घुमले
भान परतले प्राण सुखावले ||४||

– नारायण
१०/२५/२३